भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-२८/०८/२०१८

# प्रेसनोट

## नऊ महीन्यापासून फरारी आरोपी अटकेत

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

भारती विद्यापिठ पोलीस स्टेशन गु.र.नं ५५६/२०१७ भादवि कलम ३०७,३२४,३३७,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९, मधील फीर्यादी नामे सौ. बबिता राम राठोड, वय. ३२ वर्षे, धंदा. बिगारी , रा- छत्रपती स्टोन क्रशर, व्यंकटेश्वरा बिल्डींगचे बाजुने, जांभुळवाडी रोड, दत्तनगर,हवेली,पुणे यांचा जखमी भाऊ नामे विजय लक्ष्मण पवार वय. ३० वर्षे, रा. सदर यास त्याचे ओळखीचा मुलगा नामे दत्ता वाघमारे याचेबरोबर आलेल्या अनोळखी इसमाने विजय यास वाईट वाईट शिवीगाळी केलेचे कारणावरुन फिर्यादी व जखमी विजय यांनी त्यास शिवीगाळी करु नको असे सांगितले असता, त्याने फिर्यादी यांस धक्का दिलेचे कारणावरुन विजय याची दत्ता वाघमारे सोबत आलेल्या अनोळखी इसमाबरोबर धक्काबुक्की झाली असता, दत्ता वाघमारे व त्याचा अनोळखी मित्र यांनी फोन करुन १० ते १२ मुले बोलावुन घेवुन फिर्यादी यांचे घरासमोरील स्टोन क्रशरचे ऑफिसजवळ, हातामध्ये लाठ्या, काठ्या, बॅट घेवुन विजय यास लाकडी दांडक्याने व बॅटने त्याचे कानास, नाकास व तोंडावर जिवे ठार मारण्याचे उद्देशाने मारहाण करुन गंभीर जखमी करुन तसेच भांडणे सोडविण्यासाठी गेलेले कल्लप्पा चव्हाण यांचे डोक्यात सतीश जाधवने बॅटने मारहाण करुन व विठ्ठल राठोड यांचे हातावर दगड मारुन जखमी करुन गाड्यांवर पळुन गेले म्हणुन वरीलप्रमाणे गुन्हा नोंद आहे.

आज रोजी तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे तपास पथकाचे स्टाफसह पो.ठाणेस रात्रपाळी डयुटीस हजर असताना वरील गुन्हयातील निष्पन्न व पाहिजे आरोपी नामे सागर दिलीप मोरे हा जांभुळवाडी तलाव या ठिकाणी येणार आहे अशी माहीती बातमीदारामार्फत पो.कर्मचारी उज्वल मोकाशी व शिवदत्त गायकवाड यांना माहीती प्राप्त झाल्याने स्टाफसह त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन पुढील योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे.

**सदरची कारवाई मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवलदार विनोद भंडलकर, प्रणव सकपाळ, उज्वल मोकाशी , गणेश सुतार ,शिवदत्त गायकवाड यांचे पथकाने केलेली आहे.**